शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.७७/२०१९

| | | |
|---|---|---|
| श्री.भाऊसाहेब दिनकर पाटील | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर.<br>२. डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर. | } | वि.प. |

डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचे डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर येथील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. भाऊसाहेब दिनकर पाटील यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२९/०५/२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

**१.** संस्थेने मला दि.०१ ऑगस्ट २०११ पासून २४ वर्षाच्या सलग सेवेची दुसरी कालबध्द् पदोन्नती प्रत्यक्षात दि.०१/०१/२०१५ पासून लागू केली. व दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१०/२०१८ अखेरचा फरक अदा केला परंतू दि. ०१/११/२०१८ पासून प्रत्यक्ष वेतनात अंमल बजावणी केली नाही. **२.** दि.०१/११/२०१८ पासून कमी देत असलेला १३ टक्के महागाई भत्ता अद्याप लागू केलेला नाही. **३.** दि.०१/०७/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेरचा १० महिन्यांचा ७ टक्के महागाई भत्याचा फरक अद्याप अदा केलेला नाही. **४.** दि.०१/०१/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखेरचा १२ महिन्यांचा ३ टक्के महागाई भत्याचा फरक अद्याप अदा केलेला नाही.

**संस्थेचा अभिप्राय :**

श्री.भाऊसाहेब दिनकर पाटील हे शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालयामध्ये टर्नर इनस्ट्रक्टर या पदावर कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्याने विविध मागणी संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे केस दाखल केली होती. सदर केससंदर्भात संस्थेचे व्यवस्थापन व श्री.बी.डी.पाटील यांचेमध्ये तडजोड होऊन सदरची केस मा.उच्च न्यायालय, मुंबई या न्यायालयातून मागे घेण्यात आलेली आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्रे आम्ही मिटींग दिवशी विद्यापीठ तक्रार निवारण चौकशी समितीपुढे सादर करू.

**समितीची निरिक्षणे :**

१. संस्थेने मला दि.०१ ऑगस्ट २०११ पासून २४ वर्षाच्या सलग सेवेची दुसरी कालबध्द् पदोन्नती प्रत्यक्षात दि.०१/०१/२०१५ पासून लागू केली व दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१०/२०१८ अखेरचा फरक अदा केला परंतू दि. ०१/११/२०१८ पासून प्रत्यक्ष वेतनात अंमल बजावणी केली नाही अशी तक्रार अर्जात नमूद केली आहे.

या तक्रीच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी समितीसमोर आपण २४ वर्षाच्या सलग सेवेची दुसरी कालबध्द् पदोन्नतीचा लाभ मिळावा तसेच अन्य तक्रारी करिता मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. संस्था व आपल्यामध्ये तडजोड होवून आपण मा.उच्च न्यायालयातील केस मागे घेतली. तडजोडीमध्ये झालेल्या चर्चेनुसार संस्थेने दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१०/२०१८ पर्यंतचा कालबध्द् पदोन्नतीचा फरक आपणास चेकने अदा केला आहे. तथापी नोव्हेंबर २०१८ पासून प्रत्यक्ष वेतनात कालबध्द् पदोन्नती लागू करण्याऐवजी स्पेशल पे म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत रक्कम अदा केली आहे. सदरची कालबध्द् पदोन्नतीची रक्कम प्रत्यक्ष वेतनात ॲड करून त्यानुसार आपले सातव्या वेतन आयोगाचे पे फिक्सीशन करण्यात यावे असे कथन केले. तसेच या प्रकरणी झालेल्या मा.उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक ६५१६/२०१६ या कामी झालेल्या तडजोडीची प्रत समितीसमोर सादर केली आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाकडून समितीसमोर तक्रारदार श्री. पाटील यांनी विविध मागणी संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे केस दाखल केली होती. सदर केस संदर्भात संस्थेचे व्यवस्थापन व श्री.बी.डी.पाटील यांचेमध्ये तडजोड होवून सदरची केस मा.उच्च न्यायालय, मुंबई या न्यायालयातून तक्रारदार यांचेकडून मागे घेण्यात आली. तसेच तक्रारदार यांनी याबाबत आपली

कोणतीही तक्रार नसल्याचे तडजोडीच्या झालेल्या अनुषंगाने स्टॅंपवर लिहून दिले आहे. ते समितीने अवलोकनी घ्यावे. कालबध्द् पदोन्नतीचा शासन निर्णय शासनाकडून रद्द करणेत आला असून या कामी मे.न्यायालयात याचिका दाखल असल्याचे कथन केले.

दोन्ही पक्षकारांचे मत अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी १२ व २४ वर्षाच्या सलग सेवेची दुसरी कालबध्द् पदोन्नती तसेच अन्य तक्रारींबाबत मा.उच्च न्यायालयात रि.पि. ६५१६/२०१६ ने याचिका दाखल केली होती. दरम्यान संस्था व तक्रारदार या उभय पक्षकारात तडजोड होवून तक्रारदार यांनी मा.उच्च न्यायालयातील केस मागे घेतली. याबाबत तक्रारदार यांनी सादर केलेल्या दि.२९ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या तडजोड शपथपत्रामधील मुद्या क्रं. ५. मध्ये That based on the above logical, moral, leagal and emotional consideration, and a payment of certain arrears as Rs.2,42,361/- (Two Lakh Forty Two Thousand Three Hundred and Sixty One), Initiated by both and the negotiation bearing positive results, I have amicably settled my Particular Claims with the Employer on the herein terms and conditions, which are fully, finally, consensually and undisputedly binding on me. व त्यास जोडलेल्या परिशिष्ट अ (ANNEX A) मधील कलम (C) मध्ये 12 years and 24 years time-bound promotion related increments, arrears and any other related dues/claims; नमूद केल्याप्रमाणे हा लाभदेखील सोडून दिलेला आहे. त्यामुळे या लाभाबद्दल तक्रारदार यांना आता तक्रार करता येणार नाही. सबब तक्रारदार यांची सदरची मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

२. तक्रारदार यांनी दि.०१/११/२०१८ पासून कमी देत असलेला १३ टक्के महागाई भत्ता अद्याप लागू केलेला नाही, दि.०१/०७/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेरचा १० महिन्यांचा ७ टक्के महागाई भत्याचा फरक अद्याप अदा केलेला नाही, दि.०१/०१/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखेरचा १२ महिन्यांचा ३ टक्के महागाई भत्याचा फरक अद्याप लागू केलेला नाही असे तक्रारीत नमूद केले आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाकडून समितीसमोर आपल्या महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना ज्या दराने महागाई भत्ता दिलेला आहे त्याच दराने तक्रारदार यांना वेतन दिलेले आहे. तसेच वाढीव महागाई भत्याबाबत संस्थेकडून निर्णय झालेस तक्रारदार यांना देय असणारा महागाई भत्याचा फरक अदा करण्यात येईल असे कथन करण्यात आले.

याबाबत समितीचे मत असे की, संस्थेने महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना ज्या दराने महागाई भत्ता दिलेला आहे. त्याच दराने तक्रारदार यांना वेतन दिलेले आहे असे समितीच्या निदर्शनास आणले. तसेच तक्रारदार यांनी सादर केलेल्या तडजोडीच्या शपथपत्रामध्ये त्यांनी शपथपत्रापूर्वीचे महागाई भत्त्याचे फरक सोडून दिल्याचे निदर्शनास येते. तसेच संस्था, महाविद्यालयाकडून तक्रारदार यांना वेळोवेळी ज्या दराने महागाई भत्ता यांना दिलेला आहे. तो तक्रारदार यांनी त्यावेळी विनातक्रार स्विकारल्याचे दिसून येते. तसेच संस्था व महाविद्यालयाकडून वाढीव महागाई भत्त्याबाबत निर्णय झालेस तक्रारदार यांना देय असणारा महागाई भत्त्याचा फरक अदा करण्यात येईल असे कथन करण्यात आलेले आहे. सबब या सर्व बाबी अवलोकनी घेता तक्रारदार यांच्या सदरच्या तक्रारी मान्य करणे उचित होणार नाही. करीता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील सर्व मागण्या अमान्य करण्यात येत आहेत.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 18 AUG 2022

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ. एन.बी.गायकवाड)

सदस्य
(श्री.ए.ए.कुलकर्णी)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)